प्रति,

मा. जनसंपर्क अधिकारी सो,
पोलीस आयुक्तालय, पुणे शहर

यांना सविनय सादर......

**प्रतिवेदक** :- वाय. पी. सुर्यवंशी, पोलीस उप निरीक्षक, फरासखाना पोलीस स्टेशन, पुणे शहर
यांजकडुन विनंतीपुर्वक की,

**विषय** :- फरासखाना पोलीस स्टेशन अकस्मात मयत रजि क्रमांक ४७/२०१८ सीआरपीसी १७४ मधील मयताची माहीती फोटोसह तपासकामी वर्तमानपत्रात प्रसिध्द होणेबाबत

महोदय,

उपरोक्त विषय व संदर्भान्वये सविनय सादर करण्यात येतो की, फरासखाना पोलीस स्टेशन अकस्मात मयत क्रमांक ४७/२०१८ मधील मयत महीला नामे कौशल्या मरीचंद अडसुल, वय ६५ वर्ष, रा. मु. पो. करमाळा, जिल्हा सोलापुर, हया दिनांक ०२/०७/२०१८ रोजी सायंकाळी १८.१५ वा चे सुमारास गणेश पेठ,दर्गाजवळ आजारी अवस्थेत मिळुन आलेने त्यांना यादीसह दिनांक ०२/०७/२०१८ रोजी १९.१३ वा ससुन हॉस्पीटल वॉर्ड क्रमांक १३ मध्ये ॲडमीट केले असता त्यांचा उपचारादरम्यान रात्रौ २१.३० वा चे सुमारास मयत झाली आहे. मयत महीलेच्या बॉडीवर एम. एल. पी. एम. नं. ३३२५/२०१८ प्रमाणे पोस्ट मार्टम होवुन मयताचे कारण **"ornary Artery Disease With Bilateral Consolidation"** असे देण्यात आलेले आहे. तसेच सदरची मयत बॉडीचे नातेवाईक मिळुन न आल्याने त्यांचा शोध होणेकामी मयत बॉडी तीन दिवस ससुन रुग्णालय शवागृहात राखुन ठेवली आहे.

**<u>मयत महिलेचे वर्णन खालील प्रमाणे :-</u>**



**नाव कौशल्या मरिचंद अडसुल, वय ६५ वर्ष, रा. मुपो करमाळा जिल्हा सोलापुर, रंगाने काळी सावळी, अंगाने मध्यम उंची ५ फुट १ इंच नाक बसके, चेहरा गोल,डाव्या हातावर गोंदलेले, डाव्या पायाचे पोटरीवर पांढऱ्या चटयाचा व्रण, नेसणीस लाल रंगाची साडी, त्यावर फुलांची नक्षी, निळया रंगाचा ब्लाऊस, केस काळे पांढरे, जवळ मोल्यवान चीज अगर वस्तु काही मिळुन आले नाही.**

तरी नमुद मयत महीलेची माहीती मयताच्या नातेवाईकांचा शोध होणेकामी सर्व वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द होणेस विनंती आहे.